## ११ ऑगस्ट रोजी प्रधानमंत्री शिकावू उमेदवारी मेळाव्याचे आयोजन

**चंद्रपूर, दि. ८ ऑगट :** ऋषी अगस्त शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर येथे ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता प्रधानमंत्री शिकाऊ उमेदवारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळावा सर्व व्यवसायाच्या आजी व माजी आयटीआय पास व शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता असून जिल्ह्यातील जी.एम. आर. इन्फ्रा, साई वर्धा पॉवर, मल्टी ऑरगॅनिक, मल्टी व्ह्यू फायबर, धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर तसेच इतर नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी येणार आहे. प्रधानमंत्री शिकाऊ उमेदवारी योजना ही केंद्र शासन पुरस्कृत असून कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे.

## ई- पीक पाहणी त्वरीत करून घेण्याचे आवाहन

**चंद्रपूर, दि. ८ ऑगस्ट :** शेतकऱ्यांनी स्वतःच्या मोबाईलद्वारे ७/१२ उताऱ्यावर शेतात लागवड केलेल्या खरीप पिकांची नोंदणी १ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनामार्फत महसुल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प २०२१ पासून संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार या प्रकल्पात सुधारणा करून रब्बी हंगाम २०२४ पासून पीक पाहणी ही डिजिटल क्रॉप सर्वे प्रणालीद्वारे संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे. सध्या खरीप हंगामातील पीक पाहणी कार्यवाही सुरू आहे. खरीप हंगाम २०२५ साठी ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपचे व्हर्जन ४.०.० अद्ययावत स्वरुपात गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी ॲपचे अपडेट करून घ्यावे.

# शिक्षक पदभरती घोटाळा प्रकरणी राज्यस्तरीय एसआयटी गठित

## आमदार सुधाकर अडबाले यांच्या प्रश्नानंतर शिक्षण विभागाचा शासन निर्णय निर्गमित

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ ऑगस्ट :** नागपूर विभागातील शिक्षक पदभरती घोटाळा, शालार्थ आयडी घोटाळ्याने राज्यात खळबळ उडाली आहे. या घोटाळ्याची व्याप्ती नागपूर विभागासह संपूर्ण राज्यात आहे. त्यामुळे राज्यातील बोगस शिक्षक पदभरती / शालार्थ आयडी प्रकरणाचा तपास एसआयटीमार्फत करावा. यात गृह, शिक्षण विभागातील निवृत्त अधिकारी व उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांचा समावेश करण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी ४ जुलै २०२५ रोजी विधानपरिषदेत तारांकित प्रश्नाद्वारे केली होती. या प्रकरणाची व्याप्ती बघता राज्यस्तरीय एसआयटी नियुक्त करण्यात येणार असल्याचे शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी उत्तर देतांना सांगितले होते. त्यानुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून प्रधान सचिव यांनी 'एसआयटी'ची घोषणा करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला. यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे.




महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात अराजकता माजली आहे. शिक्षक पदभरती घोटाळा, शालार्थ आयडी घोटाळा नागपूर या उपराजधानीत उघडकीस आला आहे. या घोटाळ्याची पाळेमुळे राज्यभर पसरली आहेत. नागपूर, भंडारा या जिल्ह्यांमध्ये बोगस भरती, शालार्थ आयडी घोटाळा उघडकीस आला. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या नियुक्तीस मान्यता व शालार्थ आयडी देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे राज्यस्तरावर तात्काळ एसआयटी नियुक्त करावी, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी विधानपरिषदेत केली होती.

यावर शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी उत्तरात नागपूर, भंडारा, नाशिक व जळगाव या जिल्ह्यांमध्ये बोगस भरती, शालार्थ आयडी घोटाळा उघडकीस आला आहे. या प्रकरणाची व्याप्ती बघता राज्यस्तरीय एसआयटी नियुक्त करून चौकशी करण्यात येणार असून, यात गृह, शिक्षण विभागातील निवृत्त अधिकारी व उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांचा समावेश करण्यात येणार असल्याचे मंत्री ना. भोयर सांगितले होते.

त्यानुसार ७ ऑगस्ट २०२५ रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून 'एसआयटी'ची घोषणा करण्यात आली. पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार (पथक प्रमुख), पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोजकुमार शर्मा व शिक्षण आयुक्तालयातील सहसंचालक (प्रशासन, अंदाज व नियोजन) हारून आतार यांचा या 'एसआयटी'मध्ये समावेश आहे. तीन सदस्यांच्या समितीकडून २०१२ पासून ते आजतागायत प्रकरणांची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. विशेष चौकशी पथकाने आपला अहवाल चौकशी पथक गठित झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत शासनास सादर करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांच्या सततच्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे.

# कोलारा ग्रा.पं. ला सिईओची भेट

## सिईओ कडून विद्यार्थ्यांचे कौतुक




**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ८ ऑगस्ट :** चिमुर तालुक्यातील काही निवडक गाव भेटी व आढावा बैठकीचा दौऱ्याच्या निमित्य जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी कोलारा तुकुम येथील ग्रामपंचायत कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन कामाची पाहणी केली.

आयएसओ मानांकन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोलारा येथे मान्यवराचे औक्षवंत करून विद्यार्थी कडून स्वागत करण्यात आले.

तालुक्यातील पहिली मॉडेल २ वर्ग खोल्याची पाहणी करण्यात आली. शाळेतील भौतिक सुविधा विषयक चर्चा करण्यात आली. ग्राम पंचायतच्या वतीने गावातील सामाजिक शैक्षणिकदृष्ट्या आरोग्य मूलभूत सुविधा विषयावर ग्राम पंचायत सरपंच शोभा कोयचाडे व सदस्य गणेश येरमे यांनी भौतिक माहिती दिली जिल्हा परिषद प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करणार असे आम्हा उपस्थिताना सांगीतले.

ग्राम पंचायत व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकीत सिह यांचा शॉल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

ग्राम पंचायत भेटी दरम्यान पंचायत समिती प्रभारी गटविकास अधिकारी मोरे विस्तार अधिकारी गणविर कांबळे ,विधाते, पोटूळे , सरपंच शोभा कोयचाडे सदस्य गणेश येरमे सचिव संजय ठाकरे मुख्याधापक किशोर गभने, दामोधर रामटेके, मधुकर बोकडे, बावनकर मॅडम ,अंगणवाडी सेविका मदतनिस गुजन सावसाकडे अर्पिता चौधरी रिना नन्नावरे उमेश जिवतोडे यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# महिलांच्या आधार कार्डवर लग्नापूर्वीचे आणि लग्नानंतरचे दोन्ही नावांची नोंद करा

## खासदार प्रतिभा धानोरकर यांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव याची घेतली भेट



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ ऑग :** शासकीय किंवा निमशासकीय कामकाजात महिलांना लग्नानंतर कागदपत्रामुळे नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. परिणामी त्यांचा वेळ आणि पैसा वाया जातो. ही समस्या दूर करण्याकरिता महिलांच्या आधार कार्डवर लग्नापूर्वीचे (वडिलांचे ) आणि लग्नानंतरचे (पतीचे ) दोन्ही नावे नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची लोकहितकारी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांना दिल्ली येथे भेट घेऊन केली आहे.

सध्याच्या नियमांनुसार, आधार कार्डवर फक्त एकच नाव नोंदवता येते. त्यामुळे, लग्नानंतर महिलांना त्यांच्या माहेरचे आडनाव सोडून पतीचे आडनाव लावावे लागते. या प्रक्रियेमुळे अनेक प्रशासकीय आणि भावनिक समस्या निर्माण होत आहेत. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी निदर्शनास आणून दिले की, अनेक महिलांचे शैक्षणिक दस्तऐवज, पदवी प्रमाणपत्र, जुने बँक खाते आणि मालमत्तेची कागदपत्रे त्यांच्या लग्नापूर्वीच्या नावावर असतात, ज्यामुळे आधार कार्डवरील नावाशी ते जुळत नाही. या विसंगतीमुळे त्यांना विविध सरकारी आणि खाजगी कामांमध्ये अडचणी येतात.

याव्यतिरिक्त, सांस्कृतिक आणि भावनिक कारणांमुळे अनेक महिलांना त्यांच्या वडिलांचे आडनाव कायम ठेवायचे असते, परंतु आधार कार्डवर ही सुविधा नसल्यामुळे त्यांना आपली एक ओळख सोडावी लागते. या प्रक्रियेमुळे वेळ आणि पैसा वाया जातो, तसेच अनावश्यक कायदेशीर गुंतागुंत निर्माण होते.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी पॅन कार्डचे उदाहरण दिले, जिथे वडिलांचे आणि लग्नानंतरचे असे दोन्ही नावे नोंदवण्याची सोय आहे. त्यामुळे महिलांची दोन्ही ओळख सुरक्षित राहते. त्याचप्रमाणे, आधार कार्डवरही ही सुविधा उपलब्ध करून दिल्यास महिलांना त्यांची ओळख जपण्याचा हक्क मिळेल, विविध कागदपत्रांमध्ये एकसारखेपणा येईल आणि प्रशासकीय अडचणी कमी होतील, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मंत्र्यांना या महत्त्वाच्या मागणीवर सहानुभूतीपूर्वक विचार करून आवश्यक निर्देश देण्याची विनंती केली आहे. त्यांनी या प्रकरणी तातडीने लक्ष घालून कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# शेतजमिनीचा मालकी पट्टा द्यावा अन्यथा आंदोलन

## पत्रपरीषदेत प्रिया खाडे यांचा प्रशासनाला इशारा

**महासागर प्रतिनिधी**




**चंद्रपूर, दि. ८ ऑगस्ट :** राजुरा तालुक्यातील मौजा वरोडा येथे गेल्या अनेक वर्षांपासून शेती करून कुटुंबांचा उदरनिर्वाह केला जात आहे. पत्रपरीषदेत रिपब्लिकन पक्षाच्या आंबेडकर महिला जिल्हाध्यक्षा प्रिया खाडे आणि संबंधित शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे शेती करणाऱ्या ४० जणांच्या नावावर संबंधित शेतजमिनीचा मालकी हक्काचा पट्टा देण्याची मागणी केली आहे, अन्यथा कुटुंबासह तीव्र आंदोलन इशारा दिला आहे.

प्रिया खाडे म्हणाल्या की, राजुरा तालुक्यातील मौजा वरोडा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्यां महाराष्ट्र सरकारच्या ४०० एकर गायरान जमिनीवर गेल्या ४० वर्षांपासून शेती करून ४० शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. परंतु या जमिनीला लागून असलेल्या वेकोलीने ४०० एकर जमीन रिकामी करण्यासाठी ग्रामस्थांना नोटीस पाठवली आहे.

यापूर्वीही राजुरा तहसीलदारांनी जमीन रिकामी करण्याची नोटीस पाठवली होती. परंतु त्यानंतर संबंधित ४० जणांनी दंड भरला होता. दरम्यान, सर्व्हे क्रमांक १०४/१ च्या खाते क्रमांक ५०१ च्या शेतजमिनीत एका व्यक्तीच्या नावावर सरकारी भाडेपट्टा करण्यात आला आहे. जर संबंधित व्यक्तीसाठी पट्टा देता येतो, तर आमच्यासाठी का करता येत नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला. या संदर्भात आमदार देवराव भोगले यांनी पत्रव्यवहार करून या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला.

या संदर्भात प्रशासनाने संबंधित शेतजमिनीचा मालकी पट्टा संबंधित शेतजमिनीला देण्याची मागणी केली आहे, अन्यथा प्रिया खाडे आणि इतर शेतकऱ्यांनी कुटुंबासह तीव्र आंदोलन सुरू करण्याचा किंवा आत्महत्या करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी गणेश मांडवकर, सागर जेरपोळ, संदीप पुल्लरवार इत्यादी उपस्थित होते.

# जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षिका सुशीला पूरेड्डीवार यांच्या विविध पुस्तकाचे प्रकाशन सोहळा संपन्न



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**गोंडपिपरी, दि. ८ ऑगस्ट :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध विषयांचे ज्ञान व्हावे,विविध गोष्टी,सोपे वैज्ञानिक प्रयोग यासह वाचनाची सवय लागावी, महापुरुषाने केलेल्या सत्कार्याची माहिती व्हावी, यासाठी जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षिका सुशीला पुरेडीवार यांनी विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी असलेल्या विविध पुस्तकांचे लेखन केले. त्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा नुकताच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा आक्सापुर येथे पार पडला. यावेळी पंचायत समिती गोंडपिपरीचे गटविकास अधिकारी संजय पुप्पलवार, गटशिक्षणाधिकारी समाधान भसारकर यांची विशेष उपस्थिती होती. पुस्तकातून विद्यार्थ्यांना गोष्टी, सोपे वैज्ञानिक प्रयोग,थोरांची माहिती लिहिलेली असल्याने विद्यार्थ्यांना (वाचकांना) प्रेरणादायी ठरणार असल्याचे लेखिका सुशीला पूरेड्डीवार यांनी सांगितले. तर गटशिक्षणाधिकारी भसारकर ,गट विकास अधिकारी संजय पुप्पलवार यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.यावेळी रवींद्र मोहूर्ले उच्चश्रेणी मुख्याध्यापक,चंद्रजीत गव्हारे उपसरपंच ग्रामपंचायत आक्सापुर, प्रणिता उईके, प्रेमचंद रत्नमाळ, संजय गजभे यासह शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलेश झाडे तर आभार प्रेमचंद रत्नमाळ यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# नागभीड तालुक्यात महसूल सप्ताहची 'सामाजिक उत्तरदायित्व दिनाने' सांगता

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ८ ऑगस्ट :** दिनांक १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने ' महसूल सप्ताह ' साजरा करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे नागभीड तालुक्यात प्रतिदिन निर्धारित असलेला कार्यक्रम पार पाडत असताना समारोपीय कार्यक्रमासाठी तहसील कार्यालय नागभीड येथील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी उपक्रम राबविलेले आहे .



' एक दिवसीय वेतन सामाजिक उत्तरदायित्वासाठी ' यात सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी तालुक्यातील अनाथ विद्यार्थी, शेतकरी, आत्महत्या झालेल्या कुटुंबातील विद्यार्थी, एकल पालक असलेले विद्यार्थी, आर्थिक दुर्बल, अपंग व दुर्धर आजार ग्रस्त असलेले विद्यार्थी यांना मदत करण्याचे निर्धारित करून आपले एक दिवसाचे वेतन स्वेच्छेने एकत्रित केले. त्यात नागभीड तालुक्याचे तहसीलदार प्रताप वाघमारे यांचे मार्गदर्शनात स्थानिक तालुक्यातील दानशूर व्यक्ती यांचेही स्वेच्छेने योगदान घेतले व या कामी स्वयंसेवी संस्था 'उपजीविका' व ' 'रुदान फाउंडेशन' त्यांचेही योगदान घेऊन गटशिक्षण अधिकारी यांचे सहकार्याने तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांना ७०० डझन वह्या, ७०० जॉमेट्री बॉक्स, ७०० स्केच पेन पॅकेट, ७००० पेन, ७०० स्कूल बॅग विद्यार्थ्यांना वितरित केले व उर्वरित साहित्याची शाळा स्तरावर 'मटेरियल बँक' तयार करून जेव्हा- जेव्हा विद्यार्थ्यांना उपलब्ध साहित्यापैकी कुठल्या साहित्याची आवश्यकता असेल तेव्हा- तेव्हा त्यांनी ते प्राप्त करून घ्यावे असा उपक्रम राबवला आहे. तसेच तालुक्यातील आदिवासी पाडे, आदिवासी बहुल गावे व शालेय विद्यार्थिनी यांचे साठी १०,००० सॅनिटरी पॅड्स उपलब्ध करुन घेण्यात आले असून कार्यालयातील महिला तलाठी यांचे मार्फत गावपातळीवर वितरण सुरू करण्यात आलेआहे. सप्ताह पश्चातही आगामी स्वातंत्र्य दिना पर्यंत या तालुक्यात, 'भूमी साक्षरता अभियान' सुरू ठेवण्यात येत असून त्या सोबतच ई पिक पाहणी बाबत जनजागृती करण्यात येणार आहे. M-Sand या धोरणांतर्गत तालुक्यातील उद्योजक यांची बैठक घेऊन माहिती देण्यात आली व त्यांना सदर धोरणाप्रमाणे लागेल ते मदत व सहाय्य करण्याचे सांगण्यात आले.

# ११ ऑगस्टला चेतना दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ ऑगस्ट :** राज्य सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांच्या महत्वाच्या प्रलंबित मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील 'एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता' पुर्ववत सुरू राहण्याकरीता शासनाने आजपावेतो सुधारीत शासन निर्णय निर्गमित केलेला नाही. त्याअनुषंगाने सर्व कर्मचारी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने प्रलंबित मागण्यांकडे शासनाचा लक्षवेध करुन घेण्यासाठी ११ ऑगस्ट २०२५ ला चंद्रपूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दुपारी २ वाजता निदर्शने देवून चेतना दिन साजरा करणार आहेत. प्रलंबित २१ मागण्यांसोबतच दि. २७.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त / आदिवासी क्षेत्रातील 'एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता' बंद करण्यांत आलेला आहे. त्याअनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील 'एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता' पुर्ववत सुरू राहण्याकरीता शासनाने आजपावेतो सुधारीत शासन निर्णय निर्गमित केलेला नाही. शिक्षण व आरोग्यविभागाच्या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे शिक्षक व आरोग्य विभागाचे कर्मचारी संतप्त आहे. त्याअनुषंगाने दि. ११ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर समोर 'धरणे आंदोलन' राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र जिल्हा शाखा चंद्रपूर च्या वतीने आयोजीत केलेले आहे.

# अभ्यासिका मुलांच्या आणि समाजाच्या भविष्यास आकार देणारे ज्ञानमंदिर ठरणार - आ. किशोर जोरगेवार

## कृष्णा नगर येथील अभ्यासिका बांधकामाचे भुमिपूजन आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ८ ऑगस्ट :** श्री श्री रामकृष्ण सेवा समितीने हाती घेतलेले हे स्वप्नवत कार्य आज पहिल्या टप्प्यात प्रवेश करत आहे. आपल्या परिसरात अभ्यासिका उभारण्याचा शुभारंभ होत आहे. ही केवळ चार भिंतींची इमारत नसून, आपल्या मुलांच्या आणि समाजाच्या भविष्यास आकार देणारे ज्ञानमंदिर ठरणार असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.



आमदार किशोर जोरगेवार यांनी कृष्णा नगर येथील श्री श्री रामकृष्ण सेवा समिती येथे अभ्यासिकेच्या बांधकामासाठी ५५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सदर कामाचे भुमिपूजन आज त्यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री मनोज पॉल, सविता दंढारे, राष्ट्रीय परिषद सदस्य तुषार सोम, बलराम डोडाणी, मंडळ अध्यक्ष ॲड. सारिका संदुरकर, सचिव विश्वजीत शाहा, रॉबिन बिश्वास, तपोष डे, प्रलय सरकार, आनंद रणशूर, सुधाकर राखडे, जितेश कूळमेथे, कृष्णा मंडळ, बलाई चक्रवर्ती, मदन शहा, संतोष चक्रवर्ती, सुशांत भद्रा, सुनील रॉय आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याचा संकल्प आपण केला आहे. ११ अभ्यासिकांचा आपला संकल्प होता; मात्र आता जवळपास २० अभ्यासिका आपण मतदारसंघात तयार करत आहोत. यातील काही अभ्यासिकांचे काम पूर्ण झाले असून, विद्यार्थी येथे अभ्यास करून स्वप्नांना पंख देत आहेत, असे ते म्हणाले. ही अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी केवळ पुस्तक वाचण्याची किंवा अभ्यास करण्याची जागा नसेल, तर त्यांच्या विचारशक्तीचा, सर्जनशीलतेचा आणि स्वप्नांचा विस्तार करणारे केंद्र ठरेल.

येथे होणाऱ्या वाचन-संवादातून, मार्गदर्शन सत्रांतून आणि विविध शैक्षणिक उपक्रमांतून अनेक तरुणाई आपले उद्दिष्ट पूर्ण करतील. केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे, तर आपल्या संस्कृतीची आणि परंपरेची जपणूक हेही या अभ्यासिकेचे ध्येय असेल. आजच्या डिजिटल युगात वाचनाची आणि प्रत्यक्ष संवादाची गरज अधिक वाढली आहे. अशा वेळी, अशी सुविधा निर्माण होणे म्हणजे पुढच्या पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मागील वीस वर्षापासून गायनाची छाप सोडणारा कलावंत सय्यद मन्सूर सय्यद अख्तर अली

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ८ ऑगस्ट :** बालपणापासूनच गायनाची आवड, अनेक मंचावर आपली कलाकृती सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. आपल्या अप्रतिम गायन शैलीने कव्वाली, आर्केस्ट्रा यासारख्या कार्यक्रमात अनेक कार्यक्रम सादर केले. असा हरहुन्नरी कलावंत म्हणजे राजूरा शहरातील सय्यद मन्सूर सय्यद अख्तर अली.



अतिशय गरीब कुटुंबात सामान्य परिस्थितीमध्ये वाढलेला कुठलेही संगीताची पार्श्वभूमी नसलेला हा कलावंत मागील वीस वर्षापासून गायकी क्षेत्रात आपलं नाव उज्वल करीत आहे. वयाच्या १५ व्या वर्षापासून तो स्टेजवरील कार्यक्रम करीत आहे.कव्वाली, आर्केस्ट्रा यामध्ये सुरेल आवाजात गीते गाताना रसिकांना मंत्र मुग्ध करतो. सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमात त्याचा नेहमी सहभाग असतो. स्वयंसेवी संस्था, शाळा कॉलेज सामाजिक संस्थांच्या वतीने आयोजित कार्यक्रमातही गावून मनोरंजन व प्रबोधन करीत असतो. उदरनिर्वाहासाठी आर्थिक कोणतेही मोठे पाठबळ नाही. गायकीच्या बळावर व इतर छोटे मोठे कामे करून कुटुंबाचा गाडा चालवितो. सामाजिक संस्थांद्वारे आयोजित आर्केस्ट्रा, कव्वाली यासारख्या कार्यक्रमातून अप्रतिम कलाकृती सादर करून रसिकांना रिझवीतो. आतापर्यंत त्याने अनेक कार्यक्रम केलेले आहेत. त्याच्या या कलाकृती बद्दल अनेक पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

